
# Vidyawarta®

Peer Reviewed International Referred Research Journal

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318



Editor

Dr. Bapu G. Gholap

MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

# विद्यावार्ता

Revised Edition

Oct. To Dec. 2019
Issue-32, Vol-06

Date of Publication
01 Nov. 2019

Editor
Dr. Bapu g. Gholap
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली
नीतिविना गति गेली, गतिविना वित्त गेले
वित्तविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले

-महात्मा ज्योतीराव फुले

विद्यावार्ता या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायक्षेत्र:बीड

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat**.

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

14) A STUDY ON WORK-LIFE BALANCE OF EMPLOYEES IN GOVERNMENT ...
Dr. V. T. KUMAR & Mr. G. RAMAMOORTHI, Tamil Nadu, India ||68

15) महाराष्ट्र व पश्चिम विदर्भातील पीक उत्पादन निर्देशांक व उत्पादकतेचे तुलनात्मक अध्ययन
डॉ. सचिन एन. भोंबे, जि. अमरावती ||73

16) महात्मा बसवेश्वरांचे आर्थिक विचार
सुनिता लिंबराज गुजर \\77

17) गडहिंग्लज नगरपरिषदेतील दलित वस्ती सुधारणा योजना: एक अभ्यास ...
डॉ. नंदकुमार रामचंद्र कोल्हापूरे, जि. कोल्हापूर ||78

18) तहानझळा कवितासंग्रहातील दुष्काळाचे चित्रण
प्रा.डॉ. सोपान माणिकराव सुरवसे, ता.जि. बीड ||81

19) भारतातील बालमजूराचे स्वरुप, कारणे, दुष्परिणाम व प्रतीबंधात्मक उपाय
प्रा. डॉ. टी. जी. सिरा‌ळ, जि. हिंगोली ||84

20) राष्ट्रसंत कृत आजचे शिक्षण
डॉ. प्रा. प्रवीण कारंजकर, जि. वर्धा ||88

21) शहरी व ग्रामीण भागातील प्राथमिक शाळेतील शिक्षकांमधील शिक्षकी मूल्य ..
प्राचार्या डॉ. सुषमा शर्मा & सहा. प्रा. लीना भागवतराव तायवाडे ||91

22) गोपाळ समाज जातपंचायत : गतकालीन स्थिती आणि सद्यस्थिती
प्रा.डॉ. सुभाष दिनुत्ती शेकडे, जि. अहमदनगर ||96

23) भारत में ईस्ट इण्डिया कम्पनी की सम्प्रभुता एवं विस्तार
डा० अश्विनी कुमार ||100

24) सुलह –ए–कुल और अकबर के धार्मिक विचार
बालेश्वर पासवान, हजारीबाग ||105

25) मौर्यकालीन आर्थिक व्यवस्था : एक विश्लेषणात्मक अध्ययन
पूजा प्रेरणा, हजारीबाग ||108

26) शिक्षण पद्धति एवं साहित्य :– ऐतिहासिक अध्ययन
भैरव यादव, हजारीबाग ||111

कोण-यात अर्थशास्त्राची आधुनिक परिकल्पनाही नव्हती. बुद्ध, कौटिल्य, इतिहासकाराच्या व उपनिषदकारांच्या नीतीचे प्राथमिक स्वरूपात असलेले काही आर्थिक विचार एखाद्या वेळी त्यांच्या लक्षात आले असतीलही परंतु आधुनिक अर्थशास्त्रज्ञांनाही आश्चर्यचकित करणारे, मार्क्स-लेनिनही या कल्पना करू शकणार नाहीत असे अनेक क्रांतिकारक आर्थिक विचार बसवेश्वरांच्या प्रतिभेच्या गर्भातून, अनुभवाच्या खोलीतून निर्माण झाले होते. प्रत्येकाने आपला मनपसंत व्यवसाय करून प्रामाणिकपणे चालवावा, त्यात कोणताही गैरवापर न करता आपल्या उदरनिर्वाहापुरते धन संपादन करावे हाच खरा धर्म आहे, असा उपदेश त्यांनी सांगितला. धर्मातच त्यांनी आर्थिक नीतीची संरचना केली.

### सारांश

अशा प्रकारे महात्मा बसवेश्वरांचे आर्थिक विचार आपणास पाहता येतात. समाजामध्ये समानता (Equality) आणण्यासाठी त्यांनी संपत्तीच्या समान वाटपावर अधिक लक्ष देण्याचे सांगितले आहे. आजही आपणाला त्यांच्या विचारांची अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. त्याचबरोबर त्यांनी श्रमाचे महत्त्व सांगितले आहे. समाजामध्ये आर्थिक समानता आणण्यासाठी महात्मा बसवेश्वरांचे विचार अंगिकारणे अत्यंत आवश्यक आहे.

### निष्कर्ष

१) महात्मा बसवेश्वरांनी बाराव्या शतकात श्रमाला महत्त्व दिले.

२) व्यवसाय स्वातंत्र्याला महत्त्व दिले.

३) संपत्तीच्या समान वाटपावर लक्ष देण्यास महात्मा बसवेश्वरांनी सांगितले.

### संदर्भ

१) आगलावे प्रदीप, समाजशास्त्रीय संकल्पना, साईनाथ प्रकाशन, नागपूर

२) डॉ.अशोक गं. मेनकुदळे, क्रांतिकारी युगप्रवर्तक महात्मा बसवेश्वर

३) डॉ.सूर्यकांत घुगरे-वीरशैव [illegible]

४) डॉ.जे. जवरेगौडा- महात्मा बसवेश्वर [illegible], पृ.११८

५) डॉ.अशोक गं. मेनकुदळे, [illegible] महात्मा बसवेश्वर

६) सुभाष कि. देशपांडे, महात्मा [illegible]

17

# गडहिंग्लज नगरपरिषदेतील दलित वस्ती सुधारणा योजना: एक अभ्यास (सन २००२ ते २००७)

डॉ. नंदकुमार रामचंद्र कोल्हापूरे
सहयोगी प्राध्यापक व राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
शिवराज महाविद्यालय, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर

**********

### प्रस्तावना

प्रस्तुत अध्ययनात यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक राज्यशास्त्र विभागात एम. फील प्राप्त प्रबंधाचा सारांश दिला आहे. हा प्रबंध सामाजिक न्याय, राज्य व गडहिंग्लज नगरपरिषद संबंधीत आहे. संशोधनाचा उद्देश महाराष्ट्र शासनाकडून प्राप्त झालेला दलित वस्ती सुधारणा योजनेचा निधी दलित वस्तीत खर्च झाला आहे काय? याचे अवलोकन करणे आणि दलित वस्तीत प्राप्त झालेल्या सुविधांनी, झालेल्या बदलाचा अभ्यास करणे हा आहे.

### प्रकरण रचना

प्रस्तुत प्रबंधाची पाच प्रकरणात विभागणी केलेली आहे.

प्रकरण : १ गडहिंग्लज नगरपरिषदेचा ऐतिहासिक आढावा

प्रकरण : २ संशोधन पद्धती व रुपरेषा

प्रकरण : ३ गडहिंग्लज शहरातील दलित वस्ती सुधारणा योजना

प्रकरण : ४ मांडणी व विश्लेषण

प्रकरण : ५ निष्कर्ष व उपाययोजना

पुढील भागात संशोधन प्रबंधाचा प्रकरणाक्रमे सारांश दिलेला आहे.

### प्रकरण : १—गडहिंग्लज नगरपरिषदेचा ऐतिहासिक आढावा

''गडहिंग्लज नगरपरिषदेतील दलित वस्ती सुधारणा योजना: एक अभ्यास'' या लघुशोध

प्रबंधामध्ये विषयाची मांडणी पाच भागात करण्यात आलेली आहे. पहिल्या प्रकरणात प्रस्तावना, दलित वस्ती सुधारणा योजना, दलित वस्ती व्याख्या, स्थानिक स्वराज्य संस्था, गडहिंग्लज शहराची भौगोलिक स्थिती, ऐतिहासिक पार्श्वभूमी, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, शैक्षणिक स्थिती, गडहिंग्लज नगरपरिषदेचा इतिहास, नागरी दलित वस्ती सुधारणा योजना केव्हा सुरू झाली? इत्यादींचा समावेश या प्रकरणामध्ये करण्यात आलेला आहे.

**प्रकरण : २ — संशोधन पद्धती व रुपरेषा**

**संशोधन विषय**

"गडहिंग्लज नगरपरिषदेतील दलित वस्ती सुधारणा योजना: एक अभ्यास (सन २००२ ते २००७) हा प्रस्तुत संशोधनाचा विषय आहे. गडहिंग्लज नगरपरिषदेने दलित वस्ती सुधारण्यासाठी राबविलेल्या योजनेशी संबंधीत आहे. पिढ्यानपिढ्या दलित समाज हा सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासलेला समाज आहे. दलित समाजाचा इतर समाजाच्या बरोबरीने विकास व्हावा यासाठी विविध योजना राबविल्या जातात. दलित वस्ती सुधारण्यासाठी राज्यशासन १०० टक्के अनुदान देते.

**दलित वस्ती सुधारणा योजनेची व्याप्ती**

महाराष्ट्र शासन नागरी दलित वस्ती सुधारणा योजनेसाठी दलित वस्तीत मूलभूत सुविधा प्राप्त व्हाव्यात यासाठी अनुदान देत असते. महाराष्ट्र शासनाने दलित वस्तीसाठी जो प्रभाग मागासवर्गीयांसाठी आरक्षित आहे, अशा प्रभागात दलित वस्ती सुधारणेचा निधी राज्याने दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार खर्च केला जातो. एखादा प्रभाग खुला असून त्या प्रभागात अनुसूचित जाती व नवबौद्ध समाजाची लोकसंख्या ५० टक्के पेक्षा अधिक आहे. अशा ठिकाणी नागरी दलित वस्ती सुधारणा योजनेचा निधी खर्च करता येतो. दलित वस्ती सुधारणा योजनेसाठी महाराष्ट्र शासनाकडून 'अ' वर्ग नगरपालिका, 'ब' वर्ग नगरपालिका, 'क' वर्ग नगरपालिका या वर्गानुसार नगरपालिकेला नागरी दलित वस्ती सुधारणेचा निधी प्रत्येक वर्षाला दिला जातो. महाराष्ट्र शासनाकडून प्राप्त झालेला निधी त्या—त्या आर्थिक वर्षा खर्च केला जातो. शासनाकडून मिळालेला दलित वस्ती सुधारणा योजनेचा निधी शासनाने दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार खर्च करावा लागतो. तशा प्रकारचे बंधन नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना असते.

**संशोधनाच्या मर्यादा**

प्रस्तुत संशोधनाला मर्यादा खालीलप्रमाणे आहेत.

(१) दलित वस्ती सुधारणा योजनेचा अभ्यास गडहिंग्लज शहरापुरता मर्यादीत आहे.

(२) दलित वस्ती सुधारणा योजनेचा अभ्यास २००२ ते २००७ या कालावधीतील केलेला आहे.

**अभ्यास विषयाचे महत्त्व**

दलित वस्ती योजनेच्या माध्यमातून गडहिंग्लज शहरातील कोणकोणत्या प्रकारच्या पायाभूत सुविधा उपलब्ध झालेल्या आहेत. दलित समाजाच्या ज्या समस्या आहेत, त्या समस्या लघुप्रबंधामध्ये मांडण्यात येत आहेत. या समस्यांचा अभ्यास व्हावा. दलित वस्तीतील समस्यांचा शासनपातळीवर शासन विचारविनिमय होऊन योग्य निर्णय व्हावा. प्रस्तुत संशोधनात नागरी दलित वस्ती सुधारणा योजनेचा निधी महाराष्ट्र शासनाकडून नगरपरिषदेला प्राप्त होतो. शासनाकडून प्राप्त झालेल्या निधीचा खर्च कोणकोणत्या विकास कामासाठी खर्च केला. दलित वस्ती सुधारणा करण्यासाठी राबविलेल्या विविध योजनांबाबत दलित समाज समाधानी आहे काय? याचा अभ्यास केला आहे. दलित वस्ती सुधारणा योजना राबविल्यामुळे दलित समाजाचा इतर समाजाप्रमाणे सामाजिक स्तर उंचाविला आहे का? याचा अभ्यास केला आहे.

**संशोधनाचा उद्देश**

प्रस्तुत लघुशोध प्रबंधाच्या संशोधनाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत.

(१) नागरी दलित वस्ती सुधारणा योजनेची माहिती करून घेणे.

(२) दलित वस्ती सुधारणांमुळे सामाजिक स्तरावर झालेल्या बदलाचा अभ्यास करणे.

(३) नागरी दलित वस्ती सुधारणा योजना राबविताना येणाऱ्या अडचणी व त्रुटी शोधून समस्यांवर योग्य त्या उपाययोजना सुचविणे.

(४) अनुसूचित जाती (राखीव) जागेवर निवडून आलेल्या नगरसेवक व नगरसेविका यांच्या कार्याची माहिती घेणे.

### संशोधनाची गृहितके

प्रस्तुत संशोधनामध्ये खालील गहितकांच्या आधारे संशोधन केलेले आहे.

(१) गडहिंग्लज दलित वस्ती सुधारणा योजनेचा निधी दलित वस्ती विकास कार्य करण्यासाठी खर्च केला आहे.

(२) नागरी दलित वस्ती सुधारणा योजना राबविताना नगरसेवक व नगरसेविकांना प्रशासकीय अडचणी आहेत.

(३) विरोधी पक्षातील नगरसेवक व नगरसेविकांना आपल्या प्रभागात दलित वस्ती सुधारणा योजना राबविताना सत्ताधारी पक्षाकडून राजकीय अडचणी निर्माण होतात.

(४) नागरी दलित वस्ती सुधारणा योजनेचा निधी शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार खर्च केला आहे.

(५) नागरी दलित वस्ती सुधारणा योजनेमुळे सामाजिक समता प्रस्थापित होण्यास मदत झाली आहे.

(६) नागरी दलित वस्ती योजनेमुळे दलितांचा सामाजिक व राजकीय स्तर उंचाविला आहे.

### संशोधनासाठी नमुना निवड पद्धतीचा वापर

प्रस्तुत लघुप्रबंधात संशोधन करीत असताना दलित वस्तीतील लोकांची समस्या आणि गडहिंग्लज नगरपरिषदेत राबविलेल्या दलित वस्ती सुधारणा योजना यासाठी नमुना निवड पद्धतीचा अवलंब केलेला आहे.

२००१ च्या जनगणनेनुसार गडहिंग्लज शहरातील अनुसूचित जातीची लोकसंख्या २३७१ इतकी होती. तर अनुसूचित जमातीची लोकसंख्या ९३ होती. गडहिंग्लज नगरपरिषदेत दोन प्रभाग अनुसूचित जातीसाठी राखीव आहेत. या प्रभागातून ४० स्त्री प्रतिसादक आणि ४० पुरूष प्रतिसादक यांच्याकडून प्रश्नावली भरूण घेतली आहे.

### तथ्य संकलन

तथ्य संकलन हे संशोधनात महत्त्वाचे कार्य असते. तथ्य म्हणजेच सत्याचा शोध होय. तथ्य संकलनाकरीता वापरावयाची पद्धत ही संशोधन कोणत्या प्रकारचे आहे यावरून ठरवावी लागते. तथ्य संकलन पद्धतीत प्राथमिक साधने, शासकीय कागदपत्रे, दस्तऐवज, वार्षिक अहवाल, अनौपचारिक चर्चा, संरचित प्रश्नावली यासारख्या प्राथमिक साधनांचा वापर करण्यात आला. त्याचबरोबर दुय्यम साधनांमध्ये वर्तमानपत्रे, संदर्भग्रंथ, प्रकाशित लेख, छायाचित्रे, इंटरनेट यांच्या माध्यमातून माहिती गोळा केली.

### तथ्य विश्लेषण

प्रस्तुत संशोधनात जी तथ्ये, माहिती आहे, तिचे वर्गीकरण व संकेतीकरण केलेले आहे व त्यानुसार विश्लेषण करण्यात आलेले आहे. संशोधकाने अनुसूचित जातीसाठी राखीव असलेल्या प्रभागातील ४० पुरूष नागरिक व ४० स्त्री नागरिक अशा एकूण ८० प्रतिसादकांकडून प्रश्नावली भरून घेतलेल्या आहेत. २००१ ते २००६ आणि २००६ ते २०११ या कालावधीसाठी निवडून आलेले नगरसेवक, नगरसेविका आणि नगराध्यक्ष यांच्याकडून प्रश्नावली व मुलाखती घेतलेल्या आहेत. सोपी सारणी करून तथ्यांचे विश्लेषण केलेले आहे.

### संशोधनाचा मागोवा

आजपर्यंत गडहिंग्लज नगरपरिषदेचा आर्थिक दृष्टीने अभ्यास झालेला आहे. गडहिंग्लज नगरपालिकेचा इतिहास याविषयी संशोधन झालेले आहे.

दलित वस्ती सुधारणा योजना याविषयी महाराष्ट्रातील दलित वस्ती सर्वेक्षण २००१ (अर्थ व सांख्यकी संचालनालय नियोजन विभाग महाराष्ट्र शासन) यांचे सर्वेक्षण हे ग्रामीण पातळीवर राबविलेल्या दलित वस्ती सुधारणा योजना या विषयाचे सर्वेक्षण झालेले आहे. यशदा पुणे येथे दलित वस्ती सुधारणा योजनेविषयी काम झालेले आहे. संशोधकाने लघुप्रबंधासाठी 'गडहिंग्लज नगरपरिषदेतील दलित वस्ती सुधारणा योजना: एक अभ्यास (सन २००२ ते २००७)' या निवडलेल्या विषयावर यापूर्वी संशोधन झालेले नाही. गडहिंग्लज नगरपरिषदेत दलित वस्ती सुधारणा योजना राबवून दलित वस्तीमध्ये सुधारणा कशा पद्धतीने झालेली आहे. या विषयी शोध घेण्याचा प्रयत्न संशोधकाने केलेला आहे.

### प्रकरण : ३ — गडहिंग्लज शहरातील दलित वस्ती सुधारणा योजना

प्रस्तुत प्रकरणात गडहिंग्लज नगरपरिषदेने राबविलेल्या दलित वस्ती सुधारणा योजनेविषयी माहिती आहे. गडहिंग्लज नगरपरिषदेने सन २००२ ते २००७ या कालावधीत दलित वस्ती सुधारणेसाठी राबविलेल्या योजनांचे संशोधन केलेले आहे.

### प्रकरण : ४ — मांडणी व विश्लेषण

प्रस्तुत प्रकरण हे मांडणी आणि विश्लेषण याविषयी आहे. दलित वस्तीतील नागरिकांच्या भरून घेतलेल्या प्रश्नावली तसेच नगरसेवक, नगरसेविका, नगराध्यक्ष, प्रशासकीय अधिकारी यांच्या प्रश्नावली व मुलाखती यांचे विश्लेषण केलेले आहे.

**प्रकरण : ५ – निष्कर्ष व उपाययोजना**

प्रस्तुत प्रकरणात संशोधकाने गृहितकांची तपासणी केली आहे. याचबरोबर राजकीय निष्कर्ष, सामाजिक निष्कर्ष, भौतिक सुविधा, दलित वस्ती सुधारणा योजना याविषयी संशोधनातील प्राथमिक व दुय्यम साधनांच्या आधारे निष्कर्ष काढून शिफारशी केलेल्या आहेत. हे निष्कर्ष आणि शिफारशी दलित वस्ती सुधारणेला उपयोगी ठरू शकतात.

**सारांश**

महाराष्ट्र शासनाने १९९५–९६ साली नागरी दलित वस्ती सुधारणा योजना सुरू केली. शहरी भागातील दलितांचे राहणीमान उंचवावे, दलित वस्तीत पायाभूत सुविधा प्राप्त व्हाव्यात याकरीता खास ही योजना राबविली जाते. गडहिंग्लज नगरपरिषदेने दलित वस्तीत सिमेंट रस्ते, हायमास्ट दिवे, गटारी, समाजमंदिर, सांस्कृतिक हॉल इत्यादी सुविधा दलित वस्ती सुधारणा योजनेतून निर्माण केलेल्या आहेत. यातून दलित वस्तीतील लोकांचा सामाजिक स्तर उंचावण्यास मदत झालेली आहे. परंतु दलित वस्ती सुधारणा योजनेच्या निधीचा वापर हा अनुसूचित जातीसाठी राखीव असलेल्या प्रभागात झालेला दिसतो. या प्रभागात दलित वस्ती सुधारणा योजनेतून विकास कामे झालेली दिसतात. परंतु या प्रभागात दलित वस्ती नाही. आरक्षित प्रभागातील प्रतिनिधी निवडून येण्यासाठी परत संधी प्राप्त व्हावी याकरीता दलित वस्ती सुधारणा योजनेचा निधी खर्च करताना दिसतात.

दलित वस्ती सुधारणा योजनेचा निधी हा दलित वस्तीत अधिक खर्च झाला पाहिजे. या निधीचा वापर इतर ठिकाणी न करता त्याचा वापर हा दलित वस्तीतच केला जावा. दलित वस्तीतील निधीच्या, खर्चाच्या व कामाच्या बाबतीत पारदर्शकता आवश्यक आहे. दलित वस्तीतील नागरिक, लोकप्रतिनिधी आणि प्रशासन या सर्वांच्या एकत्री सहकार्यातून, समन्वयातून या योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी होण्यास मदत होऊ शकते.

❑❑❑

**18**

# तहानझळा कवितासंग्रहातील दुष्काळाचे चित्रण

प्रा.डॉ. सोपान माणिकराव सुरवसे
मराठी विभाग,
स्वा. सावरकर महाविद्यालय बीड, ता.जि. बीड

***********

इंद्रकुमार झांजे यांचा तहानझळा हा कवितासंग्रह मराठवाड्यातील विविध पैलूंचे दर्शन घडवितो. शेती आणि शेतकरी यांच्या मुळावर उठणा-या दुष्काळामुळे शेतक-यांचे संपूर्ण जीवनच संपून जाते, कृषिजीवनाशी निगडीत असलेला गावगाडा मोडकळीस येऊ पहातो. तर कधी कुटुंब उध्दवस्त करतो. काळ्या आईची ओटी भरण्यासाठी पावसाची, पाण्याची गरज असते पण दुष्काळी स्थितीमुळे जगणे अवघड होते. कोणतेही तत्वज्ञान कामी पडत नाही. प्रत्येक गावचे एक तत्त्वज्ञान असते. पण ख-या अर्थाने गावावर दुष्काळाचं संकट येते तेंव्हा कवी म्हणतो....

गावातलं गावपण
गेलं जसं हरवून
तळ्यामधी पाणी नाही
गेल जसं जिरुन ?
गावातले वाडे सारे
गेलेत कसे पडून
आडातले पाणी खोल
गेलयं कसं जिरुन ?[1]

गावात गावपण राहण्यासाठी माणसांचे असणं गरजेचं असते. पण गावात पिण्यासाठी पाणी मिळना. त्यामळे गावातील माणसं परगावी गेल्यानं सारा गावं ओस पडला, जोपर्यंत गावात माणसं होती तोपर्यंत विचारांची देवाणघेवाण होत होती. पण आता लोकं जगण्यासाठी गेली, गाव रिकामा झाला फक्त गावात शेतकरी राहतो पण त्याच्याही पदरात काहीच पडत नाही. एवढेच नाही तर गावात एक रीत असते, एक प्रकारचे स्त्रीला बंधनात राहावे लागत असते. पण अशा ओसाड गावामध्ये बायकोसुध्दा आपल्या नव-याला भीत नाही. कवी म्हणतो की, ज्या पारावर बसून न्यायनिवाडा होत होता, गावातील माणसांनी जगायचं कसं,